मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# देखणा मुर्ख राजा

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
रूपान्तरकार: Lyn Doerksen
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2015 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

इस्त्राएलांचा शास्ता आणि पुढारी शमुवेल आता म्हातारा झाला होता. त्याच्या जागेवर देवाची सेवा करण्यासाठी त्याने त्याच्या मुलाला इस्त्राएलांवर शास्ता नेमले. परंतू शमुवेलचे मुलगे दुष्ट होते. त्यांना पैसा प्रीय होता आणि अप्रामाणिकपणे पैसा मिळविण्यासाठी ते त्यांच्या अधिकाराचा वापर करित होते.



मुलांच्या दुष्टतेमुळे इस्राएल लोकांना त्रासातून जावे लागले. न्यायालयात विपरीत न्याय केला जाई. लोकांना जेंव्हा केंव्हा मदतीची गरज लागे त्या प्रत्येक वेळी शमुवेलच्या लोकांना पैसा द्यावा लागत असे; ते लाच घेत असत.



काहीतरी करायला हवे. एके दिवशी इस्त्राएलचे सर्व वडील जमा होऊन शमुवेलकडे गेले व त्यांनी त्याच्याकडे मदत मागितली.



"ते वडील त्यास म्हणाले," आमचा न्यायइन्साफ करावयास आम्हांवर एक राजा नेमा. शमुवेलच्या दुष्ट मुलांनी त्यांचा न्याय करावा अशी त्यांची इच्छा नव्हती. तर त्याच्या अवतीभोवती असलेल्या सर्व राष्ट्रांप्रमाणे त्यांना देखिल एक राजा असावा अशी त्यांची इच्छा होती.




शमुवेलला
याचा राग
आला. कारण
इस्त्राएलांवर आधिच राजा
होता ! सर्व समर्थ प्रभू परमेश्वर, जो
अनंतकालिक आहे, तो इस्त्राएलांवर
राज्य करित होता. फार वर्षांपूर्वी त्याने
मिसर देशाच्या गुलामगीरीतून इस्त्राएल
लोकांना सोडवले होते, त्यांच्या सुटकेसाठी
त्याने तांबडा समुद्र दुभागला होता.



आणि मग त्याने
इस्त्राएलांना त्यांची सुंदर
भूमि वतन करुन दिली.

जेंव्हा शमुवेलाने प्रार्थना केली, तेंव्हा परमेश्वर शमुवेलास म्हणाला, "त्यांनी माझा धिक्कार केला नाही, तर मी त्यांच्यावर राजा असू नये म्हणून त्यांनी माझा धिक्कार केला आहे. त्यांनी अन्य देवांची सेवा केली. त्यांचे म्हणणे ऐक आणि त्यांना राजा दे."





त्यांचा पृथ्वीवरील राजा
कसा असेल याविषयी
लोकांची चांगली
कानउघाडणी करण्यास
परमेश्वराने सांगितले. तो
त्यांचा पैसा कर म्हणून
वसूल करील; त्यांची उत्तम
शेती व द्राक्षमळे तो स्वतः
ठेऊन घेईल; त्यांच्या
लेकरांना त्याच्या सैन्यात
भरती होण्याची आज्ञा
करेल; आणि त्यांच्या
मुलिंना त्याच्यासाठी काम
करण्याची तो आज्ञा करेल.

परंतू कसेही
करुन लोकांना
राजा हवा होता.





परमेश्वराने शमुवेलला एका तरुणाकडे नेले, तो तरुण फार देखणा, फार लाजाळू, आणि फार उंच होता – त्याच्या ऐवढा उंच साऱ्या इस्त्राएलांत कोणी नव्हता. त्याचे नाव शौल असे होते. जेंव्हा शमुवेलाने शौलाला पाहिले तेंव्हा परमेश्वर म्हणाला, "हा माझ्या लोकांवर सत्ता चालविल."



आज्ञापालन करित, शमुवेलाने
शौलाला इस्त्राएलांचा राजा
होण्यास अभिषेक केले.
शौलाला जेंव्हा इस्त्राएल
लोकांसमोर आणण्यात आले
तेंव्हा, "राजा चिरायु होवो!"
असे मोठ्याने म्हटले.

लवकरच शौल राजाला पारखण्यात आले. अम्मोनी, जो इस्त्राएलांचा व्देष करित होता, त्याने इस्त्राएलांच्या शहराला वेढा दिला आणि त्याने इस्त्राएल लोकांचा उजवा डोळा फोडून टाकाण्याची योजना आखली होती. कित्ती क्रूर योजना ! या धमकीची बातमी शौल राजा पर्यंत जाऊन पोचली.





जेंव्हा दोन्ही सैन्य समोरा–समोर आले, शौलाने अम्मोन्यांचा पराभव केला आणि इस्त्राएलांच्या शहराला त्यांच्या तावडीतून सोडवले. "...आज परमेश्वराने इस्त्राएलाचा उध्द्‌ार केला आहे." असे म्हणत शौल राजाने परमेश्वराला गौरव दिले.

त्या दिवशी देवाने शौलाला मोठा विजय दिला. परंतू प्रत्येक वेळी शौलाने देवाचा सन्मान केला नाही. एके दिवशी पलिष्टी लोकांशी युध्द् करण्याआधि शौलाने स्वतः होमार्पण केले. ते शमुवेलाचे काम होते हे त्याला माहित होते.

शमुवेल होमार्पण करण्यासाठी येईल तोवर त्याने वाट पाहावी अशी देवाची अपेक्षा होती हे त्याला माहित होते. परंतू शौलाने देवाची आज्ञा पाळली नाही.



जेंव्हा शमुवेल तेथे येऊन पोहोचला, तेंव्हा तो शौलास म्हणाला, "तूं मुर्खपणा केला आहे. तुझा देव परमेश्वर याने केलेली आज्ञा तूं मानिली नाही. तर आता तुझे राज्य कायमचे राहावयाचे नाही."



हे फारच लहान पाप आहे असे कदाचित शौलाला वाटले असावे. परंतू देवाच्या आज्ञा न पाळणे हे हमेशा गंभिरच असते.



दुसऱ्या ऐका वेळी, सर्व दुष्ट अमालेकींचा नाश करण्याचे परमेश्वराने शौलास सांगितले. परंतू शौल आणि त्याच्या लोकांनी



अमालेकींचा राजा अगाग याला जिवंत राहू दिले. तसेच त्यांनी मौल्यवान वस्तू, उत्तम मेंढरे आणि बैल देखिल राहू दिले. हे सर्व देवाला अर्पण करण्यासाठी राहू दिले आहे असे शौलाने सांगितले.



त्यावर शमुवेल शौलास म्हणाला,
"पाहा, यज्ञापेक्षां आज्ञा पाळणे बरे.
तूं परमेश्वराचा शब्द मोडिला आहे
म्हणून त्यानेहि तुला राज्यपदावरुन
झुगारुन दिले आहे." त्याच्या
पापाबद्दल शौलाला फार वाईट
वाटले. परंतू तोवर फार उशिर झाला
होता. तो परमेश्वराच्या आज्ञा पाळू
शकला नाही म्हणून त्याचे उर्वरित
जीवन दुःखी बनले.

देखणा मुर्ख राजा

परमेश्वराची वाणी – बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

१ शमुवेल ८–१६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला!   योहान 3:16